# किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १८ पासून

## वसुंधरा मित्र व वसुंधरा गौरव पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

या वर्षीचा पाचवा किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव १८ ते २१ सप्टेंबर या कालावधीत शाहू स्मारक भवन येथे होणार आहे. या महोत्सवांतर्गत विविध उपक्रमांबरोबरच स्पर्धाही घेण्यात येणार आहेत, अशी माहिती कलामहर्षी बाबुराव पेंटर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत जोशी आणि किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि.चे वरिष्ठ व्यवस्थापक रमेश चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

- चंद्रकांत जोशी व रमेश चव्हाण यांची माहिती
- विविध पर्यावरण जनजागृती उपक्रमांसह स्पर्धेंही आयोजन

अधिक माहिती देताना चंद्रकांत जोशी यांनी सांगितले की, १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता ज्येष्ठ पर्यावरणतज्ञ विश्वंभर चौधरी यांच्या हस्ते शाहू स्मारक भवन येथे या महोत्सवाचे उदघाटन होणार आहे. निसर्ग संवर्धन हे प्रमुख तत्व व उद्दिष्ट असणाऱ्या या महोत्सवात देशी व विदेशी असे ३५ चित्रपट दाखवण्यात येतील. या महोत्सवात युवा संसद, चित्रकला स्पर्धा, लघुनाटिका स्पर्धाही घेण्यात येणार आहेत. १९ ते २१ सप्टेंबर या कालावधीत सकाळी नेचर वॉक असून यात कोंडीग्रे येथील ग्रीन हाऊस, पोहाळे येथील बौध्दकालीन गुहा व किर्लोस्कर कंपनीतील पर्यावरण उपक्रमांचा समावेश आहे.

जोशी म्हणाले, १९ सप्टेंबर रोजी वसुंधरा मित्र व वसुंधरा गौरव पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यंदाचा वसुंधरा मित्र पुरस्कार मिलिंद यादव आणि गजानन जोशी यांना तर देवराई या संस्थेला जाहीर करण्यात आला आहे. या महोत्सवात आबा कांबळे, उज्जला नागेशकर, राणीता चौगुले, आनंद यादव, भारतआप्पा पाटील, सौ.पाटील यांना वसुंधरा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. दररोज तीन विभागात चित्रपट दाखवले जातील. उदघाटन समारंभावेळी चित्रकला स्पर्धेतील निवडक चित्रांच्या प्रदर्शनाचे उदघाटन होईल. २१ सप्टेंबर अखेर रोज सकाळी दहा ते रात्री ८ पर्यंत प्रदर्शन सर्वांना खुले राहणार आहे. युवा संसद ही २० सप्टेंबर रोजी डी. वाय.पाटील मेडीकल कॉलेज सभागृह, कसबा बावडा येथे होईल. १४ सप्टेंबर रोजी हिंडाल्को प्रकल्प, दुर्गमानवाड व काळम्मावाडी धरण परिसराचा निसर्ग भ्रमंतीचा दुसरा टप्पा होईल. त्याचदिवशी राम गणेश गडकरी सभागृह आणि कोल्हापूर स्टील लि.सभागृह, एमआयडीसी-शिरोली येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा होईल. मूकबधीर, अपंग व मतीमंद मुलांसाठी चित्रकला स्पर्धा सकाळी ११ वाजता होईल. १५ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता पेटाळा येथील राम गणेश गडकरी हॉलमध्ये पर्यावरण जागृतीसाठी आंतरशालेय लघुनाटिका स्पर्धा होईल.


मिलिंद यादव


गजानन जोशी

नाव नोंदणी १२ ते १७ सप्टेंबरअखेर कलामहर्षी बाबुराव पेंटर फिल्म सोसायटी कार्यालय, जुना देवल क्लब इमारत येथे केली जाईल. तसेच १८ सप्टेंबर रोजी शाहू स्मारक भवन येथे नोंदणी करण्यात येणार आहे.पत्रकार परिषदेला पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड, विलास कुलकर्णी, राहूल पवार, दिलीप बापट यांच्यासह संयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.

दैनिक तरुण भारत दि. ११ सप्टेंबर २०१४